महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय,लेखा व कोषागारे,
तळ मजला, कस्तुरी इमारत,
ज. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०

दुरध्वनीक्रमांक :- ०२२ - २२६२२०२९/२२६२६२९१ ई मेल :- aaomahapardat.mu-mh@gov.in

---

पहा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर १२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि.०७.०२.२०१८

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/तेरा, दि. २४.०२.२०२०

३) संचालनालयाचे पत्ररिपत्र क्र. संलेको ०३.२०१८/गोअकक्ष/स.अ.२/गोअपरिपत्रक/२०१७-१८/७८, दि. १६.०४.२०१८

---

क्र. संलेको/गोअक/सअ-१/परिपत्रक/Work Flow/ 22-2 दिनांक :- 26/04/2022

## -: परिपत्रक :-

"गट-अ" आणि "गट-ब" (राजपत्रित) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल "महापार" या संगणक प्रणालीत नोंदविण्याकरीता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. ०७.०२.२०१८ मधील परिशिष्ट-अ मधील प्रपत्र-१ मधील आस्थापनाविषयक माहिती आवश्यक आहे. याकरिता संदर्भ क्र. ३ अन्वये संचालनालयाचे परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार मंत्रालयात कार्यरत असलेल्या म.वि.ले.से. गट-अ व गट-ब मधील अधिकारी यांची माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे. यास्तव म.वि.ले.से. गट-अ व गट-ब मंत्रालय येथे कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी यांनी दि.०४.०५.२०२२ पर्यंत "प्रपत्र-अ" ची माहिती संचालनालयास aaomahapardat.mu-mh@gov.in या ई-मेल आयडीवर (PDF स्वरुपात) ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी. सदर ई-मेल व्यतिरिक्त संचालनालयाच्या इतर शाखांच्या ई-मेलवर माहिती पाठविण्यात येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. विहित वेळेत "प्रपत्र-अ" ची माहिती प्राप्त न झाल्यास आपला कार्यमूल्यमापन अहवाल महापार मध्ये भरला जाणार नाही व त्यास संचालनालय हे जबाबदार राहणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. (ई-मेलद्वारे माहिती पाठविताना शक्यतो स्वत:च्या शासकीय ई-मेलद्वारे पाठवावी. अन्य ई-मेलद्वारे पाठविते समयी विषयात प्रामुख्याने स्वत:चे नाव, पदनाम व कार्यालयाचे नाव नमूद करण्यात यावे.)

सदरचे परिपत्रक महाकोषवर प्रसिध्द करण्यात येत असल्याने स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची सर्व अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

(स्मिता कुलकर्णी)
सह संचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

d:\nilesh\aao cr\work flow परिपत्रक.docx